Open Access
उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका
(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 445 – 447
DOI: 10.5281/zenodo.10132679

Original Research Article

# महात्मा गांधी आणि विश्वस्त संकल्पना

प्रा. डॉ. कोनेरू बाबन्ना डुमलवाड

विभाग प्रमुख, लोकप्रशासन विभाग, कर्मयोगी तुळशीराम पवार महाविद्यालय, हाडोळती ता. अहमदपूर जि. लातूर ४१३५१४ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: koneru.dumalwad11@gmail.com

Received: 13 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 27 October, 2023

## प्रस्तावना

मानवाने दुसऱ्याच्या सहकार्याने आजपर्यंत जो विकास केला ते अद्भूत आहे. निसर्गाला व आपल्यापेक्षा बलिष्ठ हिंस्त्र पशुला आपल्या बुध्दीने वश करून आपले जीवन सुरक्षित केले आणि अधिक सुखद बनविले मानवातील सहकार्याचे उचित मूल्यमापन व्हावे म्हणून विनियमाला समाजजीवनात त्याने स्थान दिले परंतू यांमुळे समाजात विषमता निर्माण केली आणि शोषणाला जन्म दिला हे पाहुन समाजात समता यावी यांसाठी अनेक समाजसुधारक, महात्मे व थोर पुरुष यांनी निरनिराळे उपाय सुचविले, की ज्यांच्यामुळे मानवसमाजात एकता यावी सर्वांना आपला विकास साधण्याची व सुखसोयीने राहण्याची संधी मिळावी परंतू या प्रयत्नात त्यांना संपूर्णपणे यश मिळाले नाही. समाजात विषमता कायम असून, पैसा हा शोषण करल्याचे साधन ठरले.

समाजात असणारी असमता ही त्यांची दुर्बलता वाढणारी असून विकासात ती अडचण निर्माण करणारी आहे. ही अडचण दूर करण्यासाठीचा मार्ग म्हणून गांधीजीच्या विश्वस्त संकल्पनेकडे बघितले जाते. गांधीजीचा विश्वस्त सिद्धांत कित्येकजण अव्यवहारिक मानतात. सिद्धांत रूपाने जरी तो बरा वाटला तरी तरी आचरणात येण्यासारख्या नाही असे मानण्यात येते पण जरा खोल विचार केला तर असे आढळून येईल की तोच अधिक व्यवहार्य व कमी धोक्याचे आहे.

## संशोधनाची उद्दिष्टे

१. महात्मा गांधी यांची विश्वस्त संकल्पनेचाअभ्यास करणे.

२. विश्वस्त संकल्पनेची वर्तमानकाळातील गरज याचा अभ्यास करणे

**संशोधन गृहीतक**

१. महात्मा गांधीचे विश्वस्त संकल्पना आर्थिक विषमता नष्ट करण्यासाठी होती.

२. महात्मा गांधीच्या विश्वस्त संकल्पनेशिवाय सध्याची आर्थिक विषमता कमी होणार नाही.

**संशोधन पद्धती**

सदर शोधनिबंध लिहिण्यासाठी वर्णनात्मक पद्धतीचा वापर केला असुन द्वितीय स्त्रोतांचा वापर केला आहे

**महात्मा गांधी आणि विश्वस्त संकल्पना**

विश्वस्त ही गांधीवादी अर्थव्यवस्थेतील एक महत्त्वाची संकल्पना आहे. महात्मा गांधींनी श्रीमंतांनी संपत्तीचे विश्वस्त व्हावे स्वामी होऊ नये अशी कल्पना मांडली होती. याचा अर्थ श्रीमंतांनी आपली मालमत्ता लोकहितार्थ वापरावी केवळ स्वतःच्या उपभोगासाठी वापरू नये. असे त्यांना अभिप्रेत होते. माणसाने आपल्या गरजा किमान ठेवाव्यात. या तत्त्वज्ञानाला अनुसरून त्यांची विश्वस्ताची कल्पना होती. सन्मानाने जगण्यास लागणाऱ्या संपत्तीपेक्षा जेवढी जास्त संपत्ती असेल त्यांवर श्रीमंतानी हक्क सांगू नये त्या संपत्तीवर समाजाची मालकी असावी व ती समाजाच्या कल्याणासाठीच वापरली जावी. असे महात्मा गांधीना वाटत होते. या भूमिकेमागे आर्थिक समतेचे तत्व होते. भांडवलदार, संस्थानिक, जमीनदार यांनी विश्वस्त कल्पना अमलात आणल्यास समाजातील विषमता नष्ट होईल या कल्पनेनूसार भांडवलदार स्वतःहून कारखान्यावरील हक्क सोडून देऊन विश्वस्त म्हणुन भूमिका बजावतो व कामगार ही मालकाच्या बरोबरीने विश्वस्त बनतात. या मार्गाने भांडवलशाहीचे रूपांतर समतेवर आधारलेल्या अर्थव्यवस्थेत होईल, असे महात्मा गांधीजीचे मत होते. मात्र धनिकास आपल्या संपत्तीवरील हक्क सक्तीने, बळाने वा हिंसक मार्गाने सोडावयास न लावता त्यांचे हृदयपरिवर्तन करून त्यास त्यागास प्रवृत्त केले पाहिजे. त्यातूनही कारखानदार विश्वस्ताची भूमिका अमान्य करू लागल्यास अहिंसक असहकार पुकारावा असे महात्मा गांधींनी सुचविले. विश्वस्त वृत्ती ही माणसांच्या मूलभूत चांगुलपणावर व सत्प्रवृत्तीवर भर देणारी नैतिक संकल्पना असुन तिचा उगम प्यूरिटन धर्ममतामध्ये आहे. जगातील सर्वच वस्तूंवर अखेर परमेश्वराचीच सत्ता आहे माणसाला त्यांने फक्त उपजिविकेचा अधिकार दिला आहे. अशीही धारणा होती.

महात्मा गांधींनी बनारस हिंदू विश्वविद्यालयाच्या उद्घाटन प्रसंगी 1916 सालच्या फेब्रुवारी महिन्यात जे भाषण केले त्यात त्यांनी विश्वस्त वृत्तीचा प्रथम उल्लेख केला. संस्थानिकांनी आपणास प्रजेच्या संपत्तीचे विश्वस्त मानून तिच्या कल्याणासाठी राज्याच्या उत्पन्नाचा विनियोग करावा असा सल्ला त्यांनी त्या भाषणात दिला.

म. गांधीजी म्हणतात, "जरी उद्योगधंद्यात किंवा वारसा हक्काने संपत्ती मिळाली तरी ती सर्व संपत्ती त्या व्यक्तीची नसते त्यांचा तर इतकाच अधिकार आहे की ज्या रितीने लाखो लोक आपला उदरनिर्वाह करतात त्यांचप्रमाणे त्याने सन्मानपूर्वक आपला निर्वाह करावा. त्या संपत्तीवर राष्ट्राचा हक्क असुन त्याचा उपयोग राष्ट्रहितासाठी झाला पाहिजे. हा सिद्धांत मी त्यावेळी मांडला की, जेव्हा जमीनदार व राजेराजवाडे यांचा संपत्तीविषयी समाजवादी सिद्धांत देशापूढे

आला. समाजवादी विशिष्ट सोयी मिळालेल्या वर्गास नष्ट करू इच्छित होते परंतू त्यांची संपत्ती व संपत्ती विषयी लोभ असुनही जर ते सामान्य लोकांच्या जे मेहनत करून भाकरी मिळवितात त्यांच्या बरोबरीचे होतील तर मला हवे आहे."

सामान्यपणे भांडवलदार केवळ भांडवलदारच नव्हे तर बरेचसे लोक या गोष्टीचा विचारच करत नाहीत की, आपण पैसा कसा मिळवितो? अहिंसेचा प्रयोग करणाऱ्यांचा असा विश्वास असला पाहिजे की, कोणीही माणूस कितीही पतित झाला तरी, त्यावर कुशलतापूर्वक व सहानुभूतीने उपाय केला गेला तर त्यांची सुधारणा होऊ शकते, माणसात असलेल्या दैवी अंशाला प्रभावित करण्याचा प्रयत्न करून त्यांचा अनुकूल परिणाम होईल अशी अपेक्षा ठेवावी जर समाजातील प्रत्येक माणसाने आपल्या या शक्तीचा उपयोग वैयक्तिक स्वार्थासाठी नव्हे तर सर्वांच्या कल्याणासाठी करण्याचा प्रयत्न केला तर काय समाजांच्या सुखसमृध्दीमध्ये वाढ होणार नाही का?.

**सारांश**

समाजात सर्वत्र अर्थमूलक विषमता आणि शोषण आढळते आणि त्यांमुळे समाजामध्ये वर्गविग्रह चालू असते त्याला पर्याय म्हणून गांधीजीनी विश्वस्त सिद्धांत मांडला त्यांनी समाजहिताच्या दृष्टीने विश्वस्त सिद्धांत त्यावेळी सुचविला की ज्यावेळी सम्यवादाचा सिद्धांत भारतात इतका प्रभावशाली नव्हता परंतू आता जी स्थिती आहे त्यात भांडवलदारांचे व सामान्य जनतेचे हित यात आहे की त्यांनी मिळून मिसळून एकाने दुसऱ्याच्या हिताचे रक्षण करावे. भारताला जर सुख शांती व समृद्धी हवी असेल तर त्यासाठी गांधीचा मार्गच अचूक व व्यवहारिक आहे.

**संदर्भ सूची**

१. दा. न. शिखरे, (संपा) 'महात्मा गाँधी गौरव ग्रंथ' जन्मशताब्दी निमित प्रकाशन, महात्मा गांधी स्मारक निधी पुणे ४

२. चौसाळकर अशोक, साठे सत्यरंजन, विश्वस्त पद्धती 'विकासपीडिया

३. उपरोक्त

४. रायखेलकर ए.आर 'आर्थिक विचारांचा इतिहास,विद्या बुक्स, पब्लिशर्स, औरंगाबाद